जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 1 FEB 2019
तरुण भारत

# विद्यार्थीनी शिक्षणापासून वंचित राहू नयेत

**कोल्हापूर :** केवळ आर्थिक कारणांमुळे शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एकही विद्यार्थिनी उच्चशिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी विद्यापीठ प्रशासनाबरोबरच शासकीय तसेच वैयक्तिक स्तरावरही सदैव प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही कोल्हापूरचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी शुक्रवारी दिली.

**पालकमंत्री चंद्रकांत पाटील**

शिवाजी विद्यापीठातर्फे उच्चशिक्षण घेणाऱ्या आर्थिक दुर्बल गटातील विद्यार्थिनींसाठी बस पास योजनेतील उपक्रमाचे उद्घाटन आणि यास लोकसहभागातून जमवलेला निधी विद्यापीठास प्रदान करण्याचा कार्यक्रम पार पडला. त्यावेळी मंत्री पाटील बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. दरम्यान, पालकमंत्र्यांच्या हस्ते ९ लाख रुपये निधीचा धनादेश कुलगुरू डॉ. शिंदे यांना देण्यात आला. तसेच प्रातिनिधिक स्वरुपात महाविद्यालयांचे प्राचार्य व विद्यार्थिनी यांना बस पास योजनेसाठी निधीचे वितरण करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पालकमंत्री पाटील यांनी विद्यापीठाप्रती दाखविलेल्या सहृदयतेचे स्वागत केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी स्वागत केले, तर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

पुढारी

# फेक न्यूजविरोधात संघटित लढा हवा : प्रा. तांबट

## शिवाजी विद्यापीठातर्फे राज्यस्तरीय विद्यार्थी काँग्रेस

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

फेक न्यूज ही जागतिक समस्या आहे. याचा प्रचार, प्रसार झपाट्याने होत आहे. व्यक्तिगत पातळीवर त्याचा प्रतिकार करणे कठीण आहे. त्यामुळे याविरोधात संघटितपणे लढा दिला तर निश्चितपणे फेक न्यूजवर नियंत्रण मिळवता येईल, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागातील सहायक प्राध्यापक संजय तांबट यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय विद्यार्थी काँग्रेसमध्ये ते बोलत होते. विद्यापीठाच्या निलांबरी हॉलमध्ये हा कार्यक्रम झाला.

तांबट म्हणाले, जनमाध्यमे आणि समाजमाध्यमे यांच्या निर्मितीपूर्वीपासून फेक न्यूज अस्तित्वात आहे. माहितीच्या स्फोटामुळे फेक न्यूजचा प्रसार गतीने होत आहे. हे माहितीचे प्रदूषण आहे. हे प्रदूषण रोखण्यासाठी नागरिकांना माध्यम साक्षर बनविणे गरजेचे आहे. समाज माध्यमातून येणारा आशय जसाच्या तसा न स्वीकारता त्याविषयी खात्री करून घेणे आवश्यक आहे. यासाठी जनजागृती हा चांगला पर्याय आहे. संघटितपणे लोकजागृतीवर भर दिला तर या समस्येची तीव्रता कमी होऊ शकते. डॉ. प्रवीण पाटील म्हणाले, फेक न्यूज रोखण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेले कायदे पुरेसे आहेत. परंतु, त्याचा प्रभावी अंमल करणे आवश्यक आहे. माहिती तंत्रज्ञान तज्ज्ञ विनायक राजाध्यक्ष म्हणाले, फेक न्यूजची निर्मिती नेमकी कोणी केली, याची माहिती मिळविणे कठीण जात आहे. परंतु, फेक न्यूज न पसरवणे आपल्या हातात आहे. यावेळी विविध मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

स्वागत विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी केले. यावेळी संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या नूतन विभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर यांचा सत्कार करण्यात आला. सुप्रिया शेलार यांनी उपक्रमांचा आढावा घेतला. मुंबईची तन्मयी सवदी आणि एम. ए. मास कम्युनिकेशनचा विद्यार्थी दिग्विजय कुंभार यांना विभागून बेस्ट रिसर्च पेपर ॲवॉर्ड देण्यात आला. यावेळी डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे उपस्थित होत्या. आभार चंद्रशेखर वानखेडे यांनी मानले.

# फेक न्यूजविरोधात संघटित लढा

कोल्हापूर टाइम्स टीम

'फेक न्यूजचा प्रसार झपाट्याने होत आहे. व्यक्तिगत पातळीवर त्याचा प्रतिकार करणे अवघड आहे. संघटितपणे लढा दिला तर निश्चितपणे फेक न्यूजवर नियंत्रण मिळवता येईल,' असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागातील सहायक प्राध्यापक संजय तांबट यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्यावतीने आयोजित राज्यस्तरीय विद्यार्थी काँग्रेसमध्ये समारोपाच्या सत्रात ते बोलत होते. विद्यापीठाच्या नीलांबरी हॉलमध्ये बुधवारी हा कार्यक्रम झाला.

तांबट म्हणाले, 'जनमाध्यमे आणि समाजमाध्यमे यांच्या निर्मितीपूर्वीपासून फेक न्यूज अस्तित्वात आहे. माहितीच्या स्फोटामुळे फेक न्यूजचा प्रसार गतीने होत आहे. हे माहितीचे प्रदूषण आहे. हे प्रदूषण रोखण्यासाठी नागरिकांना माध्यमसाक्षर बनविणे गरजेचे आहे. समाज माध्यमातून येणारा आशय जसाच्या तसा न स्वीकारता त्याविषयी खात्री करून घेणे आवश्यक आहे. यासाठी जनजागृती हा चांगला पर्याय आहे. संघटितपणे लोकजागृतीवर भर दिला तर या समस्येची तीव्रता कमी होऊ शकते.



शिवाजी विद्यापीठातील पत्रकारिता विभागातर्फे आयोजित विद्यार्थी काँग्रेस या उपक्रमात बोलताना ज्येष्ठ पत्रकार संजय तांबट.

**संजय तांबट यांचे प्रतिपादन; विद्यार्थी काँग्रेसचा समारोप**

शहाजी लॉ कॉलेजमधील सहायक प्राध्यापक डॉ. प्रवीण पाटील म्हणाले, 'भारतीय राज्यघटना, भारतीय दंड संहिता, माहिती तंत्रज्ञान कायदा आणि सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले निकाल विचारात घेतले तर फेक न्यूज रोखण्यासाठी नवीन कायदा करण्याची गरज नाही. या सर्व कायदे आणि तत्वांचे काटेकोर पालन केले तर अशा प्रकारांवर आळा बसू शकतो. एखाद्याची बदनामी, महिलांचे अश्लील चित्रण, लहान मुलांचे शोषण किंवा न्यायालयाचा अवमान, जातीय तसेच धार्मिक तेढ निर्माण होईल अशा स्वरुपाची माहिती फॉरवर्ड करू नये.'

माहिती तंत्रज्ञान तज्ज्ञ विनायक राजाध्यक्ष म्हणाले, 'फेक न्यूजची निर्मिती नेमकी कोणी केली, याची माहिती मिळविणे कठीण जात आहे. परंतु फेक न्यूज न पसरवणे आपल्या हातात आहे. इंटरनेटचा प्रसार जसजसा वाढत जाईल तसतसा फेक न्यूजचा प्रसारही वाढेल. त्यामुळे जनजागृती आणि काळजी घेणे जरुरीचे आहे.'

विभागप्रमुख डॉ. निशा मुडे पवार यांनी स्वागत केले. यावेळी संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर यांचा सत्कार करण्यात आला. मुंबईची तन्मयी सवदी आणि एम. ए. मास कम्युनिकेशनचा विद्यार्थी दिग्विजय कुंभार यांना विभागून बेस्ट रिसर्च पेपर ॲवॉर्ड देण्यात आला. यावेळी डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे उपस्थित होत्या. चंद्रशेखर वानखेडे यांनी आभार मानले.

# रशियन पाहुण्यांनी घेतला निरोप

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागाच्या माध्यमातून कोल्हापूर भेटीवर आलेले रशियन विद्यार्थी व शिक्षकांनी शुक्रवारी सायंकाळी 'तुम्ही सर्व जण रशियाला या!' असे आग्रही निमंत्रण देत निरोप घेतला. तत्पूर्वी, श्री अंबाबाई मंदिर दर्शन, पन्हाळागड, न्यू पॅलेस येथे रशियन पाहुण्यांनी भेटी दिल्या. या सर्व ऐतिहासिक वास्तूंची त्यांनी स्थानिक विद्यार्थ्यांकडून माहिती घेतली. दोन दिवसांच्या दौऱ्यानंतर विदेश भाषा विभागात झालेल्या कार्यक्रमात त्यांनी भारत देश आम्हाला आवडत असल्याचे सांगितले. तसेच कोल्हापूर हे खूप सुंदर आणि हिरवाईने नटलेले शहर असल्याचेही स्पष्ट केले. विद्यापीठ कॅम्पस सोडताना मात्र ते भावनिक झाल्याचे दिसून आले.